# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-** नागपूर महानगरपालिकेचे भांडेवाडी येथील लॅडफील मध्ये १५.३० लक्ष
**{सा.आ.अभि.विभाग}** जुन्या कच–यावर बायोमायनिंग प्रक्रिया प्रकल्प राबवून जागा मोकळी करण्याबाबत.

सध्या नागपूर शहरामधून एकूण अंदाजे ११००–१२०० मेट्रीक टन प्रति दिन घनकच–याची निर्मीती होते. कचरा भांडेवाडी येथिल लॅडफील मध्ये जमा करण्यात येत आहे. सदर लॅडफीलमधील जुन्या जमा कच–यावर बायोमायनिंग प्रक्रिया प्रकल्प राबविण्याकरीता सिटी सॉलीड वेस्ट ॲक्शन प्लान व्दारे शासनास पाठपुरावा करण्यात आला असता केंद्रशासनाचा ''स्वच्छ भारत अभियान (नागरी) २.०'' धर्तीवर महाराष्ट्र राज्यामध्ये ''स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.०'' ची अंमलबजावणी श्शासन निर्णय क्रमांक स्वमअ/२०२२/प्र.क्र.७३/नवि–३४, दिनांक १५ जुर्ले २०२२ अन्वये सुरू करण्यात येऊन नागरी स्वराज्य संस्थेमध्ये साठून असलेल्या जुन्या कच–यावर शास्त्रोक्त प्रक्रिया करून या कच–याची विल्हेवाट लावणे व नागरी स्वराज्य संस्थेमार्फत जागेची पुर्नप्राप्ती करण्याकरीता बायोमायनिंग प्रकल्प राबविण्याकरीता २८ शहरांकरीता केन्द्रशासनाने त्यांच्या हिस्याचे निधीपैकी रू. ८६.७६ कोटी राज्यशासनास उपलब्ध करून दिलेला आहे. करिता, राज्यशासनाने निर्णय क्रमांक स्वमअ/२०२२/प्र.क्र.९३/नवि–३४, दिनांक १० ऑगष्ट २०२२ अन्वये नागपूर महानगरपालिकेस १० लक्ष मॅट्रीक टन जुन्या साठलेल्या कच–यावर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करण्याकरिता बायोमायंनिग प्रकल्प राबविण्यास काही अटी व शर्तीच्या अधिन राहून मान्यता प्रदान केलेली आहे. श्शासनाने प्रचलित डि.एस.आर. दर रूपये ४२८/– नुसार प्रकल्प राशी रूपये ४२.८० कोटीस मान्यता प्रदान केलेली आहे. यामध्ये केंद्रशासनाचा हिस्सा रूपये १०.७० कोटी, राज्यशासनाचा हिस्सा रूपये १४.९८ कोटी आणि स्थानिक स्वराज्य संस्थेचा (मनपाचा) हिस्सा रूपये १७.१२ कोटीस मंजूरी आहे.

नागपूर महानगरपालिकेतर्फे सप्टेबर २०२२ मध्ये लॅडफिलमधील जुन्या जमा कच–याचे ड्रोन सर्व्हे करण्यात येऊन प्रमाण मोजण्यात आले असता एकूण १५ लक्ष मे. टन जुना कचरा असून पुढील १ वर्षामध्ये जमा होणारा कचरा ४.५ ल़क्ष मे. टन गृहीत धरण्यात येवून एकूण जुना जमा कचरा १९.५० लक्ष मे. टन अनुमानित धरण्यात आला. त्यापैकी ४.२० लक्ष मे. टन कच–यावर स्मार्ट सिटी व्दारे बायोमायंनिग प्रक्रिया करण्यात येत आहे. अशाप्रकारे उर्वरीत सुमारे १५.३० लक्ष मे. टन जुन्या जमा कच–यावर बायोमांयनिग प्रक्रिया करून जागा मोकळी करणे अपेक्षीत असल्याने राज्य अभियान संचालक, नगर विकास विभाग मुंबई यांचेशी झालेल्या ऑनलाईन चर्चा दिनांक ०९/१२/२०२२ अन्वये १५.३० लक्ष मे. टन जुन्या जमा कच–यावर बायोमांयनिग प्रक्रिया करण्याकरीता राज्य शासनाने एम्पॅनल केलेल्या तांत्रिक सल्लागार मे. ऑल इंडिया लोकल सेल्फ गर्व्हमेंट, पुणे यांच्यामार्फत अंदाजपत्रक रूपये ८३,६५,८६,१६८/– (जी.एस.टी वगळून) तयार करण्यात येवून मुख्य अंभियता, महाराष्ट्र जीवन प्राधीकरण, नागपूर विभाग यांना तांत्रिक मंजुरीस्तव सादर करण्यात येवून तांत्रिक मंजुरी आदेश बाब क्रमांक ४१३, मे २०२३ दिनांक १६/०५/२०२३ अन्वये मान्यता प्रदान केलेली आहे. तसेच सदर्हु प्रस्ताव राज्यस्तरीय तांत्रिक समिती समक्ष (एस.एल.टी.सी.) ठेवून प्रशासकीय मंजुरी प्राप्त करण्यास्तव राज्य अभियान संचालक, नगर विकास विभाग मुंबई यांना दिनांक ०५/०६/२०२३ ला सादर करण्यात आला. तथापि राज्य अभियान संचालक, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) यांनी त्यांचे पत्र क्र. स्वमअ२.०/नागपूर बायोमायंनिग/२३७/२०२३–२४, दिनांक ५ जुन २०२३ अन्वये सुचित केले की, ''प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेल्या नागपूर महानगरपालिकेच्या १० लक्ष मे. टन इतक्या जुन्या कच–यावर बायोमायनिंग प्रक्रिया करण्यासाठी स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत निधी अनुज्ञेय आहे. त्यापेक्षा अधिक असलेल्या जुन्या साठलेल्या कच–यावर बायोमायनिंग प्रक्रिया करण्यासाठी स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत सद्यस्थितीत निधी अनुज्ञेय नसल्याने मंजूर रकमेपेक्षा अधिकचा होणारा खर्च महानगरपालिकेने त्यांच्या स्वनिधीतून करावा.

उपरोक्त प्रमाणे स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत नागपूर महानगरपालिकेस १० लक्ष मे. जुन्या जमा कच—यावर बायोमायनिंग प्रक्रिया करण्याकरिता निधी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. यामध्ये मनपाचा हिस्सा रूपये १७.१२ कोटी इतका आहे आणि प्रकल्प राशी रूपये ४२.८० कोटी इतकी आहे. तथापि नागपूर महानगरपालिकेचे भांडेवाडी येथील लॅडफील मध्ये १५.३० लक्ष जुन्या कच—यावर बायोमायनिंग प्रक्रिया करणे अपेक्षित असल्याने सदर्हु प्रकल्पाकरीता रूपये ५४६.७८८ प्रति मे. टन प्रमाणे लागणारी राशी रूपये ८३.६६ कोटी एवढी असून मनपास अधिकचा खर्च रूपये ५७.९८ कोटी (८३.६६ – ४२.८० + १७.१२ = ५७.९८) आणि निवीदा काढल्यानंतर L1 निवीदाकाराव्दारे सादर करण्यात येणा—या राशीचा फरक एवढा खर्च वहन करावा लागेल. करिता नागपूर महानगरपालिकेचे भांडेवाडी येथील लॅडफील मध्ये १५.३० लक्ष जुन्या कच—यावर बायोमायनिंग प्रक्रिया करण्याकरीता निवीदा काढुन ऑपरेटर नियुक्त करणे व त्याकरीता मनपाच्या हिस्सा व लागणारा अधिकचा खर्चास मंजुरी देण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप:— १. सदर्हु प्रकल्पाकरिता लागणारा खर्च हा स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत प्राप्त निधीतून आणि मनपाचा हिस्सा व अधिकचा खर्च हा पद क्रमांक A44201272202 मधुन करण्यात येईल.

२. सविस्तर माहिती नस्तीमध्ये उपलब्ध आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 426/मनपा/प्रशासक** **दिनांक :- 20/06/2023**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर महानगरपालिकेचे भांडेवाडी येथील लॅडफील मध्ये १५.३० लक्ष जुन्या कच—यावर बायोमायनिंग प्रक्रिया प्रकल्प राबवून जागा मोकळी करण्याबाबत.

सध्या नागपूर शहरामधून एकूण अंदाजे ११००—१२०० मेट्रीक टन प्रति दिन घनकच—याची निर्मीती होते. कचरा भांडेवाडी येथिल लॅडफील मध्ये जमा करण्यात येत आहे. सदर लॅडफीलमधील जुन्या जमा कच—यावर बायोमायनिंग प्रक्रिया प्रकल्प राबविण्याकरीता सिटी सॉलीड वेस्ट ॲक्शन प्लान व्दारे शासनास पाठपुरावा करण्यात आला असता केंद्रशासनाचा ''स्वच्छ भारत अभियान (नागरी) २.०'' धर्तीवर महाराष्ट्र राज्यामध्ये ''स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.०'' ची अंमलबजावणी श्शासन निर्णय क्रमांक स्वमअ/२०२२/प्र.क्र.७३/नवि—३४, दिनांक १५ जुर्ले २०२२ अन्वये सुरू करण्यात येऊन नागरी स्वराज्य संस्थेमध्ये साठून असलेल्या जुन्या कच—यावर शास्त्रोक्त प्रक्रिया करून या कच—याची विल्हेवाट लावणे व नागरी स्वराज्य संस्थेमार्फत जागेची पुर्नप्राप्ती करण्याकरीता बायोमायनिंग प्रकल्प राबविण्याकरीता २८ शहरांकरीता केन्द्रशासनाने त्यांच्या हिस्याचे निधीपैकी रू. ८६.७६ कोटी राज्यशासनास उपलब्ध करून दिलेला आहे. करिता, राज्यशासनाने निर्णय क्रमांक स्वमअ/२०२२/प्र.क्र.९३/नवि—३४, दिनांक १० ऑगष्ट २०२२ अन्वये नागपूर महानगरपालिकेस १० लक्ष मॅट्रीक टन जुन्या साठलेल्या कच—यावर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करण्याकरिता बायोमायनिग प्रकल्प राबविण्यास काही अटी व शर्तीच्या अधिन राहून मान्यता प्रदान केलेली आहे. श्शासनाने प्रचलित डि.एस.आर. दर रूपये ४२८/— नुसार प्रकल्प राशी रूपये ४२.८० कोटीस मान्यता प्रदान केलेली आहे. यामध्ये केंद्रशासनाचा हिस्सा रूपये १०.७० कोटी, राज्यशासनाचा हिस्सा रूपये १४.९८ कोटी आणि स्थानिक स्वराज्य संस्थेचा (मनपाचा) हिस्सा रूपये १७.१२ कोटीस मंजूरी आहे.

नागपूर महानगरपालिकेतर्फे सप्टेबर २०२२ मध्ये लॅडफिलमधील जुन्या जमा कच—याचे ड्रोन सर्व्हे करण्यात येऊन प्रमाण मोजण्यात आले असता एकूण १५ लक्ष मे. टन जुना कचरा असून पुढील १ वर्षामध्ये जमा होणारा कचरा ४.५ ल्क्ष मे. टन गृहीत धरण्यात येवून एकूण जुना जमा कचरा १९.५० लक्ष

मे. टन अनुमानित धरण्यात आला. त्यापैकी ४.२० लक्ष मे. टन कच—यावर स्मार्ट सिटी व्दारे बायोमायंनिग प्रक्रिया करण्यात येत आहे. अशाप्रकारे उर्वरीत सुमारे १५.३० लक्ष मे. टन जुन्या जमा कच—यावर बायोमांयनिग प्रक्रिया करून जागा मोकळी करणे अपेक्षीत असल्याने राज्य अभियान संचालक, नगर विकास विभाग मुंबई यांचेशी झालेल्या ऑनलाईन चर्चा दिनांक ०९/१२/२०२२ अन्वये १५.३० लक्ष मे. टन जुन्या जमा कच—यावर बायोमांयनिग प्रक्रिया करण्याकरीता राज्य शासनाने एम्पॅनल केलेल्या तांत्रिक सल्लागार मे. ऑल इंडिया लोकल सेल्फ गर्व्हमेंट, पुणे यांच्यामार्फत अंदाजपत्रक रूपये ८३,६५,८६,१६८/— (जी.एस.टी वगळून) तयार करण्यात येवून मुख्य अंभियता, महाराष्ट्र जीवन प्राधीकरण, नागपूर विभाग यांना तांत्रिक मंजुरीस्तव सादर करण्यात येवून तांत्रिक मंजुरी आदेश बाब क्रमांक ४१३, मे २०२३ दिनांक १६/०५/२०२३ अन्वये मान्यता प्रदान केलेली आहे. तसेच सदर्हु प्रस्ताव राज्यस्तरीय तांत्रिक समिती समक्ष (एस.एल.टी.सी.) ठेवून प्रशासकीय मंजुरी प्राप्त करण्यास्तव राज्य अभियान संचालक, नगर विकास विभाग मुंबई यांना दिनांक ०५/०६/२०२३ ला सादर करण्यात आला. तथापि राज्य अभियान संचालक, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) यांनी त्यांचे पत्र क्र. स्वमअ२.०/नागपूर बायोमायंनिग/२३७/२०२३—२४, दिनांक ५ जुन २०२३ अन्वये सुचित केले की, ''प्रशास कीय मान्यता प्रदान करण्यात आलेल्या नागपूर महानगरपालिकेच्या १० लक्ष मे. टन इतक्या जुन्या कच—यावर बायोमायनिंग प्रक्रिया करण्यासाठी स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत निधी अनुज्ञेय आहे. त्यापेक्षा अधिक असलेल्या जुन्या साठलेल्या कच—यावर बायोमायनिंग प्रक्रिया करण्यासाठी स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत सद्यस्थितीत निधी अनुज्ञेय नसल्याने मंजूर रकमेपेक्षा अधिकचा होणारा खर्च महानगरपालिकेने त्यांच्या स्वनिधीतून करावा.

उपरोक्त प्रमाणे स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत नागपूर महानगरपालिकेस १० लक्ष मे. जुन्या जमा कच—यावर बायोमायनिंग प्रक्रिया करण्याकरिता निधी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. यामध्ये मनपाचा हिस्सा रूपये १७.१२ कोटी इतका आहे आणि प्रकल्प राशी रूपये ४२.८० कोटी इतकी आहे. तथापि नागपूर महानगरपालिकेचे भांडेवाडी येथील लॅडफील मध्ये १५.३० लक्ष जुन्या कच—यावर बायोमायनिंग प्रक्रिया करणे अपेक्षित असल्याने सदर्हु प्रकल्पाकरीता रूपये ५४६.७८८ प्रति मे. टन प्रमाणे लागणारी राशी रूपये ८३.६६ कोटी एवढी असून मनपास अधिकचा खर्च रूपये ५७.९८ कोटी (८३.६६ — ४२.८० + १७.१२ = ५७.९८) आणि निवीदा काढल्यानंतर L1 निवीदाकाराव्दारे सादर करण्यात येणा—या राशीचा फरक एवढा खर्च वहन करावा लागेल. करिता नागपूर महानगरपालिकेचे भांडेवाडी येथील लॅडफील मध्ये १५.३० लक्ष जुन्या कच—यावर बायोमायनिंग प्रक्रिया करण्याकरीता निवीदा काढुन ऑपरेटर नियुक्त करणे व त्याकरीता मनपाच्या हिस्सा व लागणारा अधिकचा खर्चास मंजुरी देण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**